PIMPRI - CHINCHWAD NEW TOWN DEVELOPMENT AUTHORITY,

NEAR AKURDI RAILWAY STATION, PUNE-411044.

D. T. P.

FOR TENDER NOTICE NO :ENGG. A -...... FOR 2018-19

TENDER NO :.........

NAME OF WORK : - Providing Machinery, Vehicles and Labours for demolition of unauthorised constructions of P.C.N.T.D.A. Area.

**कामाचे नांव :-** **प्राधिकरण क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे पाडण्यासाठी व त्या संबंधीचे सामान हलविण्याच्या कामाकरीता मजुर, वाहने व मशिनरी पुरविणे या कामाकरीता निविदा मागाविणेबाबत...**

| | |
|---|---|
| Estimated Cost | --- |
| Tender form Fee | Rs.1,000/- |
| Earnest Money Deposit | Rs.25,000/- |
| Security Deposits | Rs.2,00,000/- |

Pimpri chinchwad New Town
Development Authority
New Administrative Building,
Near Akurdi Railway station,
Pune - 411044
Tel :- 020 - 27652934 Fax : 020 -27652935

## पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, पुणे-44.

**निविदा सूचना क्र.** ENGG. / A-..... **सन** 2018 - 19

(TENDER NO :-...........)

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी व त्यासंबंधीचे सामान हलविण्याच्या कामाकरीता खालील तपशील प्रमाणे मजुर, वाहने व मशिनरी पुरविणे याकामाकरीता ऑनलाईन ई टेंडरिंग पध्दतीने निविदा मागवित आहेत.

| Cost of Tender form | Earnest Money Deposit | Security Deposit |
|---|---|---|
| Rs.1,000/- | Rs.25,000/- | Rs.2,00,000/- |

| **अ.क्र.** | **तपशिल** | **दर रुपये** |
|---|---|---|
| 1 | मजूर (प्रत्येकी) प्रति दिन | |
| 2 | मुकादम (प्रत्येकी) प्रति दिन | |
| 3 | ट्रक भाडे (प्रत्येकी) प्रति दिन | |
| 4 | जे.सी.बी. (प्रत्येकी) प्रति तास | |
| 5 | पोकलेन Hydraulic Breaker सह प्रति तास<br>(अतिक्रमण निष्कासन ठिकाणी ने-आण करण्याच्या वाहतूक खर्चासहित) | |
| 6 | भाडयाचे वाहन (जीप) प्रति दिन | |
| 7 | गॅस कटर (प्रत्येकी) प्रति तास | |
| 8 | हायड्रो क्रेन (प्रत्येकी) प्रति दिवस | |
| 9 | एयर ब्रेकर (प्रत्येकी) प्रति दिवस | |
| 10 | इलेक्ट्रीकल ब्रेकर (प्रत्येकी) प्रति दिवस | |
| 11 | कॉंक्रिट ब्रेकर व कॉम्प्रेसर (प्रत्येकी) प्रति दिवस | |
| 12 | क्रेन (प्रत्येकी 15 MT) प्रति दिवस | |
| 13 | Specilised Technical Labour Rate (Per M/T)<br>(For Demolition of mobile towers & Highrise steel structures ) | |
| 14 | 27 m High Reach Jaw Crusher/ Cutter mounted on 50 MT excavator ही मशिनरी वापरुन अनधिकृत उंच इमारती बांधकामे पाडणे. (अतिक्रमण निष्कासन ठिकाणी ने-आण करण्याच्या वाहतूक खर्चासहित खालील प्रमाणे दर नमूद करावे. ) (प्रति चौ.मी.) | |
| | 1) 1000 चौ.मी.पर्यंत चे बांधकाम पाडण्यासाठी चा प्रति चौ. मी दर. | |
| | 2)1001 ते 5000 चौ.मी. पर्यंत चे बांधकाम पाडण्यासाठी चा प्रति चौ. मी दर. | |
| | 3) 5001 चौ.मी. वरील बांधकाम पर्यंतचे बांधकाम पाडण्यासाठी चा प्रति चौ. मी दर. | |

E-tender Processing time table

| Sr. No. | Details | Start Date | Hrs. | End Date | Hrs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Publication Of Tender | | - | - | - |
| 2 | Document Download Start | | 10.00 hrs. | | 18.55 hrs. |
| 3 | Prebid Meeting | NA | NA | - | - |
| 4 | Bid Submission Start | | 10.00 hrs. | | 18.55 hrs. |
| 5 | Opening of bid (Technical cover) | | 15.00 hrs. | - | - |

Note : All the payments towards EMD and Cost of Tender Forms will be done thru e-payment gateway by using Netbanking only. Bidders who are using SB MOPS other banks Internet Banking are requested to make online payment four days in advance.

Contractor                                                    Executive Engineer

Note:-

1) All eligible/interested contractors, who want to participate in e-tendering process should compulsory get enrolled on e-tendering portal **"http://mahatenders.gov.in"** and further need to empanel online in the appropriate category applicable to them.
2) Contractor shall contact for details or difficulties in submission of online tenders if any to **The 24 x 7 Toll Free Telephonic Help Desk Number 1800-3070-2232. Mobile Nos. 91-7878007972 and 91-7878007973**
3) **It is compulsory for all participants to submit all documents online**. Bids will not be accepted by hand or by post. In case of failure of online, offer will not opened.
4) Right to reject any or all online bids of work without assigning any reasons there of is reserved with PCNTDA.
5) Detailed terms and conditions are displayed on portal.
6) Above tender Notice is displayed on www.pcntda.org.in

**Chief Executive Officer**

**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण**
**नविन प्रशासकीय इमारत, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, पुणे- 411 044**
**दुरध्वनी क्र. 020-27652934/35**

**निविदा अटी व नियम**
**भाग - एक**

**कामाचे नांव :- प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी व त्या संबंधीचे सामान हलविणाच्या कामारीता मजुर, वाहने व मशिनरी पुरविणे या कामाकरीता निविदा मागाविणेबाबत...**

1) **निविदा संच किंमत :- (Cost of Tender) -रु. 1000/-**
All the payments towards Cost of Tender Forms shall be done thru e-payment gateway by using Netbanking only. Bidders who are using SB MOPS other banks Internet Banking are requested to make online payment four days in advance.

2) **निविदा बयाणा रक्कम :- (Earnest Money Deposit) -रु. 25000/-**
All the payments towards EMD shall be done thru e-payment gateway by using Netbanking only. Bidders who are using SB MOPS other banks Internet Banking are requested to make online payment four days in advance.

3) **कामाची सुरक्षा अनामत रक्कम :- (Security Deposit)**
सदरील कामाकरीता एकूण रु. 2लक्ष सुरक्षा अनामत रक्कम भरावी लागेल. निवड झालेल्या ठेकेदाराची बयाणा रक्कम रु.25000/- Online परत करण्यात येईल. एकूण सुरक्षा अनामत रक्कम रु. 200000/- डी. डी. स्वरुपात (CEO, PCNTDA, यांचे नावे, पिंपरी चिंचवड निगडी शाखेत देय असणारे कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेकडील डी. डी.) अभियांत्रिकी विभागाने दिलेल्या चलनाद्वारे करारनामा करतेवेळी प्राधिकरण खात्यामध्ये जमा करण्यात यावी.

4) ज्या ठेकेदारांची निविदा मंजूर करण्यात येईल त्या ठेकेदारास इरादापत्र देण्यात येईल व दिलेल्या मुदतीत सुरक्षा अनामत रक्कम भरावी लागेल व योग्य रक्कमेची स्टॅप फी भरुन करारनामा करावा लागेल.

5) **निविदा ग्राह्यता कालावधी :- (Bid Validity Period)**

1) निविदा सादर (Submission) केल्याच्या दिनांकापासून निविदा दर 120 दिवसांसाठी ग्राह्य राहील.

2) उपरोक्त कामासाठी निविदेचा कालावधी 1 वर्ष राहील.

**6) एक निविदा एकाच निविदाकारासाठी :-**

1) कोणत्याही ठेकेदाराने सदर कामासाठी फक्त एकदाच निविदा दर सादर करणे आवश्यक आहे. दोन विभिन्न निविदा दर सादर केल्यास निविदा अग्राह्य ठरविण्यात येईल.
2) ज्या ठेकेदारांची निविदा मंजूर करण्यात आली आहे त्या ठेकेदारास इरादापत्र देण्यांत येईल. इरादापत्रामध्ये दिलेल्या मुदतीत सुरक्षा अनामत रक्कम भरावी लागेल व योग्य रक्कमेची स्टॅम्प फी भरुन करारनामा करावा लागेल.
7) निविदा स्विकृत करणे अथवा नाकारण्याचा हक्क हा पूर्णपणे प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकारात राखीव आहेत आणि त्यांचे निर्णय हे अंतिम व कायदेशीर बंधनकारक राहतील.

8) **या कामाचे विधीवत कार्यक्षेत्र हे पुणे व पिंपरी चिंचवड असे राहिल.**

9) **ऑनलाईन ई निविदा ह्या दोन लिफाफा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत.**

10) **ऑनलाईन ई टेंडरींग प्रक्रियेत लिफाफा क्र. 1 मध्ये खालील कागदपत्रांची स्कॅनकॉपी सादर (Upload/submission) करणे आवश्यक आहे.**

**लिफाफा क्र.1**

10.1) निविदा संच किंमत रु. 1000/- online payment receipt ची स्कॅनकॉपी
10.2) निविदा बयाणा रु. 25000/- online payment receipt ची स्कॅनकॉपी
10.3) महाराष्ट्र शासनाच्या पी. डब्ल्यू. डी. तसेच एम. ई. एस्., सी. पी. डब्ल्यू डी./ महानगरपालिका यापैकी कोणत्याही एका संस्थेचे/कार्यालयाचे विहित वर्गातील ग्राहय कालावधीमधील ठेकेदार नोंदणीप्रमाणपत्र अथवा संस्थानोंदणी प्रमाणपत्र.
10.4) व्यवसाय कर परवाना प्रमाणपत्र
10.5) लेबर ॲक्ट लायसन्स प्रमाणपत्र
10.6) मागील तीन वर्षाचे आयकर विवरणपत्रासह चार्टर्ड अकौटंट (CA) चे प्रमाणपत्र
10.7) संस्थेचे / फर्मचे PAN No च्या प्रमाणपत्राची स्कॅनकॉपी.
10.8) अतिक्रमण निष्कासनाचे (Demolition work) काम केल्याचे अथवा मागील तीन वर्षात रक्कम रु. 2 कोटी पर्यंतच्या खर्चाचे स्थापत्य विषयक (Earthwork) चे काम समाधानकारक पूर्ण केल्याचे शासकिय/निम शासकिय संस्थेकडील सक्षम अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे अनुभव प्रमाणपत्र जोडण्यांत यावे. (Work Experienc Certificate)
10.9) उपरोक्त कामासाठी आवश्यक असणारे मजुर, वाहने, व मशिनरी उपलब्ध करुन दयावयाची क्षमता असलेबाबतचा पुरावा म्हणून स्वत:ची मालकी हक्काची कागदपत्रे किंवा भाडेपट्टा करारनामा निविदेसोबत सादर करावा.

**लिफाफा क्र. 2 मध्ये खालील प्रपत्र upload /submission करावे.**

1. निविदा प्रपत्र -'अ' (Tender Rate Offer sheet-Price Bid)"
2. निविदा प्रपत्र -'ब' (Average Price Bid Calculation Sheet)

**(टिप:- Online लिफाफा क्र. 1 मध्ये वर नमुद केलेली आवश्यक ती कागदपत्रे असल्यास त्यानंतर Online लिफाफा क्र. 2 उघडण्यात येईल.अन्यथा लिफाफा क्र. 2 उघडले जाणार नाही.)**

-----------------------------------*---------------------------------------------------

**पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, नवीन प्रशासकीय इमारत.**
**आकुर्डी रेल्वे स्टेशनजवळ, पुणे - 44**

---

## सर्वसाधारण अटी व शर्ती

### भाग क्र. 2

1) निष्काशित करावयाचे बांधकाम कमीत कमी वेळेत पाडणेसाठी आवश्यक असलेली मशिनरी, मनुष्यबळ ठेकेदाराने लावणे ठेकेदारास बंधनकारक राहील.

2) निविदा प्रपत्र - ब मधील अ.क्र. 1 ते 12 मध्ये नमुद घटकांच्या संख्येनुसार होणारी एकूण सरासरी रक्कम विचारांत घेऊन कमीत कमी दराची निविदा (L-1) मंजूर करण्यात येईल.

3) निविदा प्रपत्र -अ मधील क्र.13 व 14 या बाबींसाठी निविदांमधून प्राप्त झालेले कमीत कमी दर विचारात घेतले जातील.

4) उपरोक्त कामासाठी आवश्यक असणारी वाहने व मशिनरी सुस्थितील उत्तमरितीने कार्यक्षम असावीत.

5) ज्या दिवशी अतिक्रमण निर्मुलनाचे काम हाती घेतले जाईल त्याचे आदले दिवशी लागणाऱ्या मजुरांची, वाहनांची सुचना दिली जाईल. या सुचनेप्रमाणे अंदाजे एका दिवशी 25 ते 300 मजुर, 25 मजुरामागे एक सुपरवायझर, व 10 ट्रक (10 टनी), 10 जेसीबी व 10 पोकलेन पुरविण्याची क्षमता असली पाहिजे. मात्र कारवाईसाठी आवश्यक असलेली मजुर, सुपरवायझर, मशिनरीच्या संख्येबाबत कामाच्या व्याप्तीनुसार नियंत्रक अधिकारी निश्चित करतील तेवढया संख्येने मजुर, सुपरवायझर, मशिनरी. पुरविणे आवश्यक आहे.फक्त पोकलेन पुरवठा करण्याकरिता रस्ते वाहतुक शाखा यांचे आदेशानुसार जड वाहने (Poclain Trailor सह) करिता मध्य रात्रीनंतरच वाहतूक करावी लागेल. त्या अनुषंगाने ठेकेदारास बिल अदा करण्यात येईल. त्याबाबतची ठेकेदाराने नोंद करुन दर सादर करावे.

6) ठेकेदाराकडील बांधकाम पाडण्यासाठी लागणारे सर्व आवश्यक साहित्य उदा. घण, पहार, कटावणी, टिकाव, फावडे कोयते, कुऱ्हाड, सुऱ्या, पाने, गॅस कटर, दोरखंड इ. साहित्य पुरेशा प्रमाणात असले पाहिजेत.

7) उपरोक्त कामासाठी आवश्यक असणारी वाहने व मशिनरी यांचा इंधनखर्च, चालक व ऑपरेटर खर्च, देखभाल व दुरुस्ती खर्च अथवा इतर खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे. त्यासाठी निविदा दर (Tender Rate offer sheet) सादर करतांना दर पृथ:क्करण तक्ता (Rate analysis sheet) सादर करणे आवश्यक आहे.

8) उपरोक्त कामासाठी आवश्यक असणारी वाहने व मशिनरी, वाहनचालक/ ऑपरेटर त्यांचे सुपरवायझर /सहाय्यक, मजूर/कामगार तसेच वाहन व मशिनरी यांचा आवश्यकतो योग्य रक्कमेचा विमा उतरवलेला असणे आवश्यक तसेच विमा संरक्षण देणेची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

9) सदरील कामाच्या दरम्यान वाहनचालक/ऑपरेटर त्यांचे सुपरवायझर/सहाय्यक, मजुर / कामगार यांना दुखापत झाल्यास तसेच वाहने व मशिनरी यांची तोडफोड किंवा इतर नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी ही ठेकेदाराची राहील.

10) उपरोक्त कामासाठी आवश्यक असणारी वाहने व मशिनरी, इत्यादी संबंधीत ठेकेदारास दुरध्वनी वरुन अथवा समक्ष सुचना दिल्यानंतर त्वरीत उपलब्ध करुन दयावयाची आहेत.

11) ठेकेदाराकडील बांधकाम पाडण्यासाठी कामाचे ठिकाणापर्यंत मजूर, मशिनरी इ. आणण्याची व तेथून नेण्याची व्यवस्था ठेकेदाराने स्वखर्चाने केली पाहिजे.

12) नेमलेल्या कामाच्या दिवशी मजूर, ट्रक, जेसीबी, पोकलेन पुरवू न शकल्यास होणाऱ्या नुकसानीची, दंडाची रक्कम वरील सुरक्षा अनामत रक्कम व त्यास देय असणाऱ्या देयकाच्या रक्कमेमधुन कापून घेण्यात येईल. तसेच सदर रक्कम जमिन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल होण्यास पात्र होईल.

13) ठेकेदाराकडे व्यवसाय कर परवाना आणि आवश्यक ते लेबर लायसेन्स असणे आवश्यक आहे.

14) ठेकेदाराकडे तसेच त्यांच्या प्रतिनिधीकडे त्वरित संपर्क साधता येईल. अशी व्यवस्था मोबाईल /दुरध्वनी संपर्क यंत्रणा असली पाहिजे.

15) डिमॉलिशनच्या कामाची अंमलबजावणी होत असताना किंवा होण्यापूर्वी अथवा नंतर मजुर व इतर कर्मचारी यांना कोणत्याही प्रकारची इजा किंवा नुकसान झाले तर त्यास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही. ती जबाबदारी सर्वस्वी ठेकेदाराची राहील.

16) ठेकेदाराचे काम समाधानकारक वाटल्यास अथवा अ.क्र. 10 ची पुनरावृत्ती झाल्यास कंत्राट रद्द करण्याचे व दंड लावण्याचे अधिकार सर्वस्वी प्राधिकरणाकडें राहतील.

17) कराराचा कालावधी एक वर्षाचा राहील. आवश्यकता भासल्यास सदर करारनाम्यास मंजूर निविदादराने, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजूरीने मुदतवाढ देण्यात येईल. सदर कालावधी संपल्यानंतर 30 दिवसांनी अनामत रक्कम परत करण्यांत येईल.

18) नेमलेल्या कामाच्या दिवशी मजूर, ट्रक, यंत्रसामुग्री पुरवू न शकल्यास होणाऱ्या नुकसानाची व दंडाची रक्कम सुरक्षा अनामत रक्कमेतुन कापण्यात येईल. नुकसानीची रक्कम ठरवितांना प्रत्यक्षात त्या मोहिमेसाठी प्राधिकरणाचा जो काही खर्च झालेला आहे (ज्यामध्ये कर्मचाऱ्याचे, सुरक्षा व्यवस्था खर्च वेतन इत्यादी) तो खर्च गृहित धरण्यात येईल व या झालेल्या खर्चाच्या 25% रक्कम दंड म्हणून लावण्यात येईल. हा खर्च व दंड अनामत रक्कमेतुन किंवा ठेकेदाराच्या देयकातुन वजा करुन घेण्यात येईल किंवा ठेकेदारास तात्काळ हि रक्कम प्राधिकरणाकडे भरता येईल. ज्यावेळी ही रक्कम अनामत रक्कमेपक्षा जास्त असेल त्यावेळी ठेकेदाराने त्वरित (15 दिवसाच्या आत) हि रक्कम प्राधिकरणाकडे जमा करण्यात यावी. कोण्त्याही परिस्थितीत ठेक्याच्या कालावधीत अनामत रक्कम हि **रु.**2 लक्ष ही प्राधिकरणाकडे जमा राहिल. याची ठेकेदाराने करारनामा करताना काळजी घ्यावयाची आहे. आवश्यकता पडल्यास नुकसानीची व दंडाची रक्कम जमिन महसुल थकबाकी सदराखाली वसुल करण्यांत येईल. त्याबाबत ठेकेदार प्राधिकरणाकडून नुकसान भरपाई मागणार नाही. प्राधिकरणातील अतिक्रमण निर्मुलन विभागातील जबाबदार अधिकारी कामाच्या नियोजित वेळेच्या किमान 24 तास अगोदर ठेकेदारास आवश्यक मजूर, ट्रक व यंत्रसामुग्री संख्या लेखी/तोंडी स्वरुपात कळवील.

19) ठेकेदाराने स्वत: हजर राहून किंवा प्रतिनिधी हजर ठेवून दिलेले काम मजुराकडून करुन घेतले पाहिजे.पाडलेल्या बांधकामाचे जमा साहित्य ट्रकमध्ये भरुन मजूरांकरवी नियंत्रक सांगतील त्या ठिकाणी सुरक्षितरित्या पाहोचविले पाहिजे. वाहतुक करताना सामान सुस्थितीत राहील याची जबाबदारी ठेकेदाराची राहिल.

20) अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण पाडण्याचे काम चालू असताना किंवा सुरु होण्यापूर्वी किंवा संपल्यावर ठेकेदाराने त्याच्याकडील मजूर, वाहने व यंत्रसामुग्री यांची काळजी घेणे आवश्यक आहे. वाहनास /मजुरास /यंत्रसामुग्रीस कोण्त्याही प्रकारची इजा अथवा नुकसान झाले तर त्यास प्राधिकरण जबाबदार राहणार नाही. ती जबाबदारी सर्वस्वी ठेकेदाराची राहिल. प्राधिकरण मजूर, यंत्रसामुग्री अथवा वाहनास झालेल्या नुकसानीची रक्कम अदा करणार

नाही. मजूर व ठेकेदार कर्मचारी यांची कायदेशीर दायित्वाची जबाबदारी पूर्णपणे ठेकेदारावर राहील.

21) प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तीमधील एखादया अटीवर वाद निर्माण झाल्यास सदरचा वाद मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निदर्शनास आणून देण्यात येईल त्यांनी त्या प्रकरणाावर दिलेला निर्णय हा अंतिम व बंधनकारक असेल.

22) ज्या ठिकाणी अनाधिकृत बांधकामे निष्कासित करावयाचे आहे ती जागा जर रस्त्यालगत असेल तर अशा ठिकाणचे अनाधिकृत बांधकाम निष्कासित करतांना रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा होणार नाही. तसेच नागरिकांना त्रास होणार नाही, याची योग्य ती काळजी ठेकेदाराने घेणे आवश्यक आहे. जर अतिक्रमण हटविण्याची जागा ही अडगळीच्या ठिकाणी किंवा दाट लोकवस्तीमध्ये राहत्या घराच्या लगत असेल तर इतरांच्या घरास नुकसान होणार नाही किंवा इतरांस काही इजा होणार नाही याची पुरेपुर दक्षता घेऊन अतिक्रमण हटवावे लागेल. अतिक्रमण निष्काशीत करतांना इतर कोणासही दुखापत अथवा जिवितहानी झाल्यास तसेच आजुबाजुच्या घरांचे नुकसान झाल्यास त्याची पुर्णत: जबाबदारी ठेकेदाराची राहील.

23) बहुमजली इमारत किंवा सिमेंटचे कॉलम बीम मधील अनधिकृत बांधकाम पाडण्यांसाठी संबधीत अधिकाऱ्याने दिलेल्या सुचनांप्रमाणे काम करावे लागेल.

24) अतिक्रमण मोहिम चालु असताना कंत्राटदाराने पुर्व परवानगी न देता मशिनरी, मजुर व इतर कर्मचारी हलविल्यास अथवा कारवाई करण्यांस नकार दिल्यास ठेकेदार दंडास पात्र राहील. त्यानुसार ठेकेदाराचे 100% अनामत रक्कम व त्याला देय असणारी सर्व रक्कम दंड म्हणून वसुल करण्यांत येईल.

25) मजूरांना ओळखता यावे यासाठी बिल्ले किंवा इतर साहित्याचा वापर ठेकेदाराने करावा.

26) ठेकेदाराने त्याच्याकडे कामाकरीता आलेल्या मजूरांची अनाधिकृत बांधकाम हटविताना पुरेशी काळजी घेतली पाहिजे, त्यांना योग्य ती सुरक्षा साधने ठेकेदाराने पुरविली पाहिजेत तसेच प्राथमिक औषधोपचाराचे साहित्य त्याने सोबत ठेवले पाहिजे.

27) निष्कासन मोहिम दरम्यान काही तांत्रिक अडचणीमुळे यंत्रसामुग्री पुरविली नसल्यास प्राधिकरण अतिक्रमण विभागामार्फत बाहेरुन यंत्रसामुग्री मागविली असल्यास त्यांची देयके बाजार भावानुसार आपल्या देय रक्कमेमधून वजा करुन संबधीत ठेकेदारांस देण्यात येतील.

28) निष्कासन कारवाई दरम्यान पुरविण्यात येणाऱ्या मजुरांचे वय 18 वर्षा पेक्षा जास्त असणे बंधनकारक आहे.

29) मिनीमम वेजेस ॲक्ट अंतर्गत बार्बीचे व वरील शर्ती व अटींचे पालन करुन मजुरांना रोजंदारीचा पगार देईन, असे शपथपत्र सादर करावे.

30) कोणतीही निविदा मंजुर करण्याचा अथवा कोणतेही कारण न देता सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

31) अतिक्रमण निष्कासन कामाच्या निविदेचा कालावधी 12 महिन्यांचा राहील.

32) ठेकेदारास कोणत्याही प्रकारची भाववाढ निर्देशांक (Price Escalation) देय राहणार नाही.

33) प्रतिदिन नमूद केलेले दर हे आठ तासांसाठी असतील, वाढीव प्रत्येक तासासाठी नमूद केलेल्या दराच्या 10% वाढीव दराने प्रती जादा तासांकरीता दर देय राहील.

34) अतिक्रमण निष्कासन मोहीम कोणत्याही कारणास्तव रद्द झाल्यास जर ठेकेदारास 12 तास अगोदर पूर्व सुचना दुरध्वनी अथवा भ्रमणध्वनी अन्वये कळविल्यास ठेकेदारास त्या दिवसांपोटी कोणतीही रक्कम देय राहणार नाही. या व्यतिरिक्त किमान 12 तास अगोदर अतिक्रमण मोहिम रद्द झालेची पुर्वसुचना देणे शक्य न झाल्यास तथा मोहिम सुरु होणेपुर्वी रद्द

झालेस नियोजित मोहिमेसाठी पुरविलेल्या मशिनरी, सुपरवायझर, ऑपरेटर व सहाय्यक यांचे साठी निविदा दराने देयक अदा करण्यात येईल.

35) कोर्ट केस, शासन निर्णय, प्राधिकरण सभा निर्णय अथवा इतर अपरिहार्य कारणामुळे निविदा कालावधी कमी करुन निविदा रद्द करणेचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा राहिल व त्यांचा निर्णय अंतिम राहिल व याबाबत कोणतीही नुकसान भरपाई ठेकेदारास देय राहणार नाही.

36) प्राप्त झालेल्या निविदांमधुन कमीत कमी दर असलेली निविदा निश्चित करणेसाठी, प्रपत्र 'ब' मध्ये नमूद केल्याप्रमाणे बाब क्र. 1 ते 12 साठी सर्वसाधारणपणे 1 दिवसासाठी लागणारी साधनसामुग्री विचारात घेऊन येणारी रक्कम विचारात घेण्यात येईल. बाब क्र. 13 व 14 साठी प्राप्त सर्व निविदांमधील न्युनतम दर निश्चित करणेत येईल व तो वरीलप्रमाणे न्युनतम निश्चित झालेल्या निविदाधारकास बंधनकारक राहील. तथापि याबाबतचा अंतिम निर्णय मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा असेल व तो निविदा कर्त्यांना बंधनकारक राहील.

37) ठेकेदाराने आपले दर हे आयकर, डयुटी, व्हॅट, सेवाकर, जकातकर किंवा शासनाचे अथवा स्थानिक संस्थेचे इतर कोणतेही कर तसेच कामगार विषयक खर्च धरुन सादर करावे.

38) वरील दरांची गणना प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर किंवा नियंत्रक अधिकारी सांगतील त्या ठिकाणी पोहचल्यापासून करण्यात येईल.

39) उपरोक्त निविदा प्रपत्रा मध्ये नमुद बाबी शिवाय काही जास्त बाबींची आवश्यकता लागल्यास त्याही बाबी पुरविण्याचे बंधन कंत्राटदावर राहील व अशा जादा बाबींचा मोबदला हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जिल्हा दरसुची मधील चालु दराने देण्यांत येईल.

40) अ. क्र. 14 च्या कामाबाबत निविदेच्या दरानुसार पाडावयाच्या इमारतीचे एकूण क्षेत्रफळ काढतांना प्रत्येक मजल्यांचे स्वतंत्र बाहेरचे माप विचारांत होऊन एकूण चौरस मीटर क्षेत्र काढण्यात येईल.

41) निविदा मंजूर झालेल्या निविदाधारकांने करारनामा सादर करत्यावेळी online dowonload केलेली निविदा संचाची प्रत. (DTP) स्वाक्षरी करुन 4 प्रतीत सादर करणे आवश्यक राहील.

वरीलप्रमाणे निविदेमधील सर्वसाधारण अटी व शर्ती क्र. 1 ते 41 ठेकेदारांवर बंधनकारक राहतील.

------------------------------------

******************************

**टिप :- Online ई - निविदा प्रक्रियेत निविदा हया दोन लिफाफा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत.**

Contractor Executive Engineer

**<u>निविदा प्रपत्र - अ</u>**

(Tender Rate Offer Sheet -Price Bid)

<u>ON LETTER HEAD OF FIRM</u>

**ई - निविदा प्रोसेस मध्ये लिफाफा क्र . 2 मध्ये या प्रपत्राची स्कॅनकॉपी upload करावी.**

---

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
आकूर्डी पुणे - 44

**विषय : - प्राधिकरण क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी व त्या संबंधीचे सामान हलविण्याच्या कामाकरीता मजुर, वाहने व मशिनरी पुरविणे या कामाकरीता निविदा मागविणेबाबत...**

---

मी /आम्ही, वरील विषयाचे कामाकरीता खालील प्रमाणे दर सादर करीत आहे /आहोत. मी/आम्ही निविदा माहितीपत्रकातील अटी व नियम वाचले असून ते मला/आम्हाला मान्य आहेत.

| अ.क्र. | तपशिल | दर रुपये |
|---|---|---|
| 1 | मजूर (प्रत्येकी) प्रति दिन | |
| 2 | मुकादम (प्रत्येकी) प्रति दिन | |
| 3 | ट्रक भाडे (प्रत्येकी) प्रति दिन | |
| 4 | जे.सी.बी. (प्रत्येकी) प्रति तास | |
| 5 | पोकलेन Hydraulic Breaker सह प्रति तास (अतिक्रमण निष्कासन ठिकाणी ने-आण करण्याच्या वाहतूक खर्चासहित) | |
| 6 | भाडयाचे वाहन (जीप) प्रति दिन | |
| 7 | गॅस कटर (प्रत्येकी) प्रति तास | |
| 8 | हायड्रो क्रेन (प्रत्येकी) प्रति दिवस | |
| 9 | एयर ब्रेकर (प्रत्येकी) प्रति दिवस | |
| 10 | इलेक्ट्रीकल ब्रेकर (प्रत्येकी) प्रति दिवस | |
| 11 | कॉंक्रिट ब्रेकर व कॉम्प्रेसर (प्रत्येकी) प्रति दिवस | |
| 12 | क्रेन (प्रत्येकी 15 MT) प्रति दिवस | |
| 13 | Specilised Technical Labour Rate (Per M/T)<br>(For Demolition of mobile towers & Highrise steel structures ) | |
| 14 | 27 m High Reach Jaw Crusher/ Cutter mounted on 50 MT excavator ही मशिनरी वापरुन अनधिकृत उंच इमारती बांधकामे पाडणे. (अतिक्रमण निष्कासन ठिकाणी ने-आण करण्याच्या वाहतूक खर्चासहित खालील प्रमाणे दर नमूद करावे. ) (प्रति चौ.मी.) | |

| | | |
|---|---|---|
| | 1) 1000 चौ.मी.पर्यंत चे बांधकाम पाडण्यासाठी चा प्रति चौ. मी दर. | |
| | 2)1001 ते 5000 चौ.मी. पर्यंत चे बांधकाम पाडण्यासाठी चा प्रति चौ. मी दर. | |
| | 3)5001 चौ. मी. वरील बांधकाम पर्यंतचे बांधकाम पाडण्यासाठी चा प्रति चौ.मी.दर | |

**टिप** :- 1) वरील अ.क्र. 1 ते 12 मध्ये नमुद घटकांच्या संख्येनुसार होणारी सरासरी रक्कम विचारांत घेऊन कमीत कमी दराची निविदा (L-1) मंजूर करण्यात येईल.

2) तसेच निविदा प्रपत्र -अ मधील अ.क्र.13 व 14 या बाबींसाठी निविदांमधून प्राप्त झालेले कमीत कमी दर विचारात घेतले जातील.

3) सोबत निविदा प्रपत्र -ब स्वतंत्र Upload करणेत येत आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी
निविदाधारकाचे/संस्थेचे नांव
पत्ता (शिक्क्यासहीत)

# निविदा प्रपत्र - ब

(Average Price Bid Calculation Sheet)

**ON LETTER HEAD OF FIRM**

**ई - निविदा प्रोसेस मध्ये लिफाफा क्र . 2 मध्ये या प्रपत्राची स्कॅनकॉपी upload करावी.**

---

| अ.क्र | तपशिल | संख्या | दर रुपये | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | मजूर (प्रत्येकी) प्रति दिन | 10 | | |
| 2 | मुकादम (प्रत्येकी) प्रति दिन | 1 | | |
| 3 | ट्रक भाडे (प्रत्येकी) प्रति दिन | 2 | | |
| 4 | जे.सी.बी. (प्रत्येकी) प्रति तास | 2 (आठ तासांसाठी) | | |
| 5 | पोकलेन Hydraulic Breaker सह प्रति तास (अतिक्रमण निष्कासन ठिकाणी ने-आण करण्याच्या वाहतूक खर्चासहित) | 1 (आठ तासांसाठी) | | |
| 6 | भाडयाचे वाहन (जीप) प्रति दिन | 1 | | |
| 7 | गॅस कटर (प्रत्येकी) प्रति तास | 1 (आठ तासांसाठी) | | |
| 8 | हायड्रो क्रेन (प्रत्येकी) प्रति दिवस | 1 | | |
| 9 | एयर ब्रेकर (प्रत्येकी) प्रति दिवस | 1 | | |
| 10 | इलेक्ट्रीकल ब्रेकर (प्रत्येकी) प्रति दिवस | 1 | | |
| 11 | कॉंक्रिट ब्रेकर व कॉम्प्रेसर (प्रत्येकी) प्रति दिवस | 1 | | |
| 12 | क्रेन (प्रत्येकी) (15MT)प्रति दिवस | 1 | | |
| | **एकूण रक्कम** | | | |

**टिप** :- 1) वरील अ.क्र. 1 ते 12 मध्ये नमुद घटकांच्या संख्येनुसार होणारी सरासरी रक्कम विचारांत घेऊन कमीत कमी दराची निविदा (L-1) मंजूर करण्यात येईल.

2) तसेच निविदा प्रपत्र -अ मधील अ.क्र.13 व 14 या बाबींसाठी निविदांमधून प्राप्त झालेले कमीत कमी दर विचारात घेतले जातील.

निविदाधारकाची स्वाक्षरी
निविदाधारकाचे/संस्थेचे नांव
पत्ता (शिक्क्यासहीत)

Contractor Executive Engineer